विशेष

# उन्हाळी सूर्यफुलाची सुधारित तंत्राने लागवड




**प्रा. संजय बडे**
(मो.नं. ७८८८२९७८५९)
दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय,
दहेगाव, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद






सूर्यफुलामध्ये परपरागीभवनासाठी मधमाश्यांचा उपयोग करता येतो, त्यामुळे परागीभवन होऊन चांगली फलधारणा होते. यासाठी मधमाशांच्या प्रतिहेक्टरी ५ पेट्या सूर्यफूल पिकांत ठेवाव्या. पीक फुलोऱ्यात असताना शक्यतो कोणतेही कीटकनाशक फवारू नये.

सूर्यफुलाची लागवड खरीप, रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामांमध्ये करता येते. सूर्यफूल हे अवर्षण परिस्थितीसुद्धा सहन करणारे पीक आहे. सूर्यफूल तेलामध्ये अधिक प्रमाणात असलेल्या लिनोलेईक आम्लामुळे या तेलाचे आहारातील महत्त्व वाढलेले आहे. उन्हाळी सूर्यफूल हे फेरपालटीचे पीक म्हणूनही उपयोगी पडते. राज्यामध्ये प्रामुख्याने हे पीक मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र या विभागात घेतले जाते.

**सूर्यफूल हेच पीक का घ्यावे ?**

* कमी कालावधीत (८० ते १०० दिवस) पीक तयार होते. * तेलाचे प्रमाण ३५ ते ४५ टक्के असते. * आहाराच्या दृष्टीने करडई तेलाखालोखाल सूर्यफूल तेल अतिउत्तम आहे. * बी वापर व उत्पादन यांचे गुणन प्रमाण इतर पिकांपेक्षा जास्त आहे. * सर्व हंगामात हे पीक घेता येते.

**जमीन :** जमीन मध्यम ते भारी व उत्तम निचरा होणारी निवडावी व जमिनीचा सामू ६.५ ते ८ इतका असावा.

**हवामान :** सूर्यफुलाची चांगली वाढ होण्यासाठी व भरघोस उत्पादन येण्यासाठी ५०० मि.मी. पर्जन्यमानाची गरज आहे. पीक कालावधी व योग्य पाऊस असल्यास ३०० मि.मी. वार्षिक पर्जन्यमान देखील पिकास पुरेसे होते.

**पेरणीचा कालावधी :** उन्हाळी हंगामात सूर्यफुलाची पेरणी ही जानेवारीचा पहिला व फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवड्यात करावी.

**लागवडीचे अंतर :** मध्यम ते खोल जमिनीत (सुधारित वाण) अंतर ४५ x ३० सें.मी. ठेवावे. या अंतरावर लागवड केल्यास रोपांची संख्या प्रतिहेक्टरी ७४००० इतकी राहील. भारी जमिनीत लागवडीचे अंतर हे ६० x ३० सें.मी. ठेवावे. या अंतरावर लागवड केल्यास प्रतिहेक्टरी रोपांची संख्या ५५००० इतकी राखली जाईल. संकरित वाणासाठी अंतर हे ६० x ३० सें.मी. ठेवावे. (रोपांची संख्या ५५००० प्रतिहेक्टर इतकी राहील.)

**बियाणे प्रमाण :** पेरणीसाठी टोकण पद्धतीने संकरित वाणाचे ५ ते ६ किलो बियाणे वापरावे व तिफणीने पेरणी केल्यास हेक्टरी संकरित वाणाचे ८ ते १० किलो बियाणे वापरावे.

**बीजप्रक्रिया :** इमिडाक्लोप्रिड (७० टक्के डब्ल्यू.एस.) ५ ग्रॅम प्रतिकिलो बियाणे याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी त्यामुळे नेक्रॉसिस या रोगांपासून या पिकाचे संरक्षण होते व पेरणीपूर्वी बियाण्यास २ ग्रॅम थायरम/ बाविस्टिन चोळावे.

**शिफारशीतील जातींची निवड**

**१. सरळ वाण :** मॉर्डन, पी.केव्ही.एस.एफ – ९, टी.ए.एस –८२, एस.एस– ५६, भानू , एल.एस.एफ–८ , फुले भास्कर, एल.एस–८

**२. संकरित वाण :** के.बी.एस.एच– १, के.बी.एस.एच– ४४, फुले रविराज, डी.आर.एस.एच–१, पी.केव्ही.एस.एच– २७, एल.एस.एफ.ए.एच– १७१.

**विरळणी :** एका जागेवर एकापेक्षा जास्त रोपे असतील तर एकच सशक्त रोप ठेवून विरळणी करावी अन्यथा सूर्यफुलाचा आकार लहान होऊन उत्पादनात लक्षणीय घट येते म्हणून विरळणी ही पेरणीनंतर १० ते १५ दिवसांनी करावी, त्यामुळे उत्पादनात १८ ते २३ टक्के वाढ होऊ शकते.

**पीकवाढीच्या अवस्थेनुसार पाणी व्यवस्थापन**

हलकी जमीन असल्यास पाण्याच्या सहा ते आठ पाळ्या, मध्यम जमिनीस चार ते पाच पाळ्या व भारी जमिनीस तीन ते चार पाळ्या देणे गरजेचे आहे. पीकवाढीच्या संवेदनशील काळात पाण्याचा ताण पडू देऊ नये याची काळजी घ्यावी. जसे की कळी धरणे, फूल उमलणे व दाणे भरणे या अवस्थेत पाणी वापराचे नियोजन करावे.

**तण व्यवस्थापन :** पीक सुमारे २० दिवसांचे असताना एक आणि ३० ते ३५ दिवसांचे असताना दुसरी कोळपणी करावी. तणाचे प्रमाण जास्त असल्यास एखादी खुरपणी करावी. आंतरमशागतीमुळे जमिनीत हवा खेळती राहून पिकाची वाढ जोमाने होते. पेरणीनंतर पहिल्याच दिवशी संध्याकाळच्या वेळेस पेंडीमिथॅलिनची शिफारशीनुसार फवारणी करावी. फवारणी करताना जमिनीत पुरेशी ओल असावी व नंतर ३५ दिवसांनी कोळपणी केल्यास तणनियंत्रण चांगल्या प्रकारे होते.

**विशेष बाब :** १) फुले उमलण्याच्या वेळी पेरणीपासून ४५ ते ५५ दिवसांनी २० पी.पी.एम. (एन.ए.ए.) या संजीवकाची फवारणी केली असता दाणे भरण्याचे प्रमाण वाढते. २) ०.२ टक्के प्रमाणात बोरॉनची फवारणी पीक फुलोऱ्यात असताना केल्यास परागकणांची कार्यक्षमता सुधारून परागीभवनास त्याचा फायदा होतो व फुलात दाणे भरण्यास मदत होते. ३) २० किलो प्रतिहेक्टरी गंधकाचे प्रमाण अमोनिअम सल्फेट किंवा एस.एस.पी. खतांतून दिल्यास पिकाचे अधिक उत्पादन मिळते.

**हस्त परागीभवन :** पीक फुलोऱ्यात असताना (५० ते ६५ दिवस) हाताच्या पंजास तलम कापड गुंडाळावे व फुलावरून घड्याळाच्या काट्याप्रमाणे हळुवारपणे हात फिरवावा. हे काम ७ ते ८ दिवस सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत करावे यामुळे उत्पादनात भरघोस वाढ दिसून येते. सूर्यफुलामध्ये परपरागीभवनासाठी मधमाश्यांचा उपयोग करता येतो, त्यामुळे परागीभवन होऊन चांगली फलधारणा होते. यासाठी मधमाशांच्या प्रतिहेक्टरी ५ पेट्या सूर्यफूल पिकांत ठेवाव्या. पीक फुलोऱ्यात असताना शक्यतो कोणतेही कीटकनाशक फवारू नये.

**उत्पादन :** सुधारित वाणाचे १० ते १२ क्विंटल प्रतिहेक्टरी व संकरित वाणाचे १८ ते २० क्विंटल प्रतिहेक्टरी उत्पादन मिळते.